नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित (रजी .एफ .१५६२)

# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब

ता .दारव्हा जि .यवतमाळ (मवि सांकेतांक ४३४)

**(Accredited by NAAC with "B" grade)**

(E mail Id – artscomcollegebori@rediffmail.com )

संस्थापक अध्यक्ष
**मा.आ. श्री. माणिकरावजी ठाकरे**

www.accboriarab.org.in
(फोन नं. ०७२३८–२५६३४१)

प्राचार्य
**डॉ. सुनील ढेरे**
मो.9730196021

जा.क्र. – कवाम/४३४/ ....../२०२२.२३ दिनांक : ......./ ....../२०२३

## पाथ्रटदेवी येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न

बोरीअरब : स्थानिक कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तकग्राम पाथ्रटदेवी येथे दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ ते ०२ मार्च २०२३ या दरम्यान आयोजित करण्यात आले होते. या आठ दिवस चाललेल्या शिबिरामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन श्री. अशोकराव ठाकरे, व्यवस्थापक न.शि.प्र.मंडळ दारव्हा, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. जगन्नाथराव बोरकर,व्यवस्थापक क.वा.महाविद्यालय, बोरीअरब, मा. श्री. जयसिंग राठोड, सरपंच पाथ्रटदेवी, प्रा. डॉ. रामचंद्र बुटले, श्री. सुभाष जाधव, श्री. रमेश राठोड उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ढेरे हे उपस्थित होते.

या आठ दिवसीय शिबिरामध्ये सकाळी श्री. गोपालभैया काळे व श्री.गणेश मोरे, श्री.सचिन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी योगप्रशिक्षण व मेडिटेशन या कार्यक्रमाचा आनंद घेतला. दुपारच्या सत्रामध्ये एकूण पाच बौद्धिक सत्राच्या माध्यमातून विविध विषयावार तज्ज्ञ मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाचा आनंद घेतला. यामध्ये पर्यावरण संवर्धनामध्ये पक्षांची भूमिका, मी भारत आहे, सेंद्रिय शेती काळाची गरज, स्त्री–पुरूष समानता:सद्य:स्थिती आणि वास्तव या विषयावार प्रा.डॉ.प्रवीण जोशी, श्री. नाना रमतकार, श्री. वैभव ठाकरे, प्रा. डॉ. सुधा खडके यांनी आपले विचार व्यक्त केले.

यामध्ये दिनांक २६ फेब्रुवारी २०२३ रोजी गावकऱ्यासाठी अत्यंत उपयुक्त अशा भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराकरिता यवतमाळ येथील नामांकित डॉक्टरांची टीम बोलविण्यात आली होती. यामध्ये हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अरूण जनबंधू, डॉ. माधुरी जनबंधू, शल्यचिकित्सक डॉ. ओजोनिश कांबळे अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. सुदर्शन कांबळे, यांचा समावेश होता. या तपासणी शिबिराचे उद्घाटन मा. खासदार भावनाताई गवळी यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरामध्ये श्रमदानाच्या माध्यमातून गावकऱ्याच्या सहकाऱ्याने गावालगतच्या जंगलातील तीन बंधारे बांधण्यात आले. तसेच गावातील परिसर स्वच्छता आणि नाल्यांची सफाई करण्यात आली. तसेच शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांनी जागर स्वच्छतेचा' हे पथनाटय सादर करून स्वच्छतेचा संदेश दिला.

दिनांक ०२ मार्च २०२३ रोजी मा. श्री. रामकृष्ण भाकडे, सहा पोलिस निरिक्षक लाडखेड यांच्या उपस्थितीमध्ये या श्रमसंस्कार शिबिराची सांगता झाली. यावेळी आठदिवसीय चाललेल्या शिबिरामधील विविध कार्यक्रमाचे कौतुक त्यांनी केले. यावेळी त्यांच्याहस्ते वृषारोपन व विविध कार्यक्रमामध्ये प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाग घेणाऱ्या गावातील लहान बालक महेश पवार, नैतिक राठोड या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार मा.भाकडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला.

या सात दिवसीय शिबिराचे यशस्वी आयोजन कार्यक्रम आधिकारी डॉ. नंदकुमार भाकरे, प्रा. प्रकाश तेलगोटे, प्रा.डॉ. सुजाता गवई, गटप्रमुख कु.संजीवनी तिजारे, अश्विन इंगाले व समस्त रासेयो विद्यार्थ्यांनी केले.

प्रति,

**मा. संपादक,**
दैनिक .............
यवतमाळ.

मा.महोदय,
वरील आशयाची बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रकाशित करून उपकृत करावे ही विनंती.